यशदा

# यशमंथन

ISSN 2229-3256

वर्ष १० वे । अंक ३ रा
जुलै-सप्टेंबर २०१६
मूल्य : रु. २०/-
तीन वर्षांची वर्गणी २०० रुपये

विचारा स्वतःला प्रश्न... :

उत्तम प्रशासनासाठी पर्यटनातून कार्यप्रेरणा

कार्यताणाचे व्यवस्थापन

सकारात्मक बदलाचे अग्रदूत व्हा!



यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

# यशदा यशमंथन

ISSN 2229-3256

जुलै-सप्टेंबर २०१६

वर्ष १० वे । अंक ३ रा

मूल्य : रु. २०/-



प्रेरणा
आनंद लिमये भाप्रसे
महासंचालक

मार्गदर्शन
सोनाली पोंक्षे-वायंगणकर भाप्रसे
उपमहासंचालक

संपादक
डॉ. बबन जोगदंड
संशोधन अधिकारी (प्रकाशन)

संपादक मंडळ
डॉ. शशिकांत लोखंडे
अतिरिक्त संचालक


## अनुक्रमणिका


- **संवाद...** २
- **समाजहितासाठी सुशासनाची आवश्यकता :** प्रा.प्रवीण घोडेस्वार ३
- **उत्तम प्रशासनासाठी पर्यटनातून कार्यप्रेरणा :** डॉ. विजयकुमार फड ५
- **डिजिटल इंडिया सुशासनाचा उत्तम मार्ग :** प्रा. उर्मिला रेड्डी ९
- **सकारात्मक बदलाचे अग्रदूत व्हा! :** प्रा. जीवन मुळे १२
- **विचारा स्वत:ला प्रश्न... :** सुरेश वांदिले १५
- **उपक्रमशील प्रशासक :** डॉ. बबन जोगदंड १८
- **कार्यताणाचे व्यवस्थापन:** डॉ. रेणुका भावसार २१
- **लोकसहभाग आणि आदर्श गाव :** प्रा. डॉ. सुधाकर भालेराव २४
- **स्वराज्याकडून सुराज्याकडे भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल:** डॉ.वि.ल.धारूरकर २६
- **शासकीय वसुली :** डॉ. संजय कुंडेटकर २९



३ वर्षांची वर्गणी रु.२००/-

यशदा यशमंथनसाठी लेख, वर्गणी, जाहिरातीसाठी पत्ता :
संशोधन अधिकारी (प्रकाशन), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७. दूरध्वनी : ०२०-२५६०८२२७
ई-मेल : editoryashmanthan@yahoo.in वेबसाइट: http://www.yashada.org



या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी
संपादक व 'यशदा' सहमत असेलच असे नाही.



# समाजहितासाठी सुशासनाची आवश्यकता

प्रा.प्रवीण घोडेस्वार

**सुशासन म्हणजे काय? याची नेमकी व्याख्या करणे तसे कठीण आहे. पण सुशासन याला म्हणावे की ज्या माध्यमातून जनतेचा विकास होऊन त्यांच्या मानवी हक्कांचे जतन व संवर्धन होईल तेव्हाच खरे सुशासन दृष्टिपथास येऊ शकेल. यावर या लेखात भाष्य केले आहे.**

आज देशासमोर जे वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामध्ये सुशासन अर्थात (Good Governance) हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. देशाचे आकारमान, सामाजिक आणि धार्मिक विविधता, रुढी-परंपरा जागतिक घडामोडींमुळे आपल्यासमोर अनेक आव्हाने उभी राहत आहेत. देशाच्या प्रजासत्ताक राज्यघटनेनुसार भारताच्या प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याची व्यवस्था उपलब्ध असायला हवी. सर्वसामान्य माणसाला आवश्यक गरजांची पूर्तता करता येऊन त्यास विकासाची आणि समृध्द जीवन जगण्याची संधी मिळाली पाहिजे, ही समाजाची नैसर्गिक अपेक्षा आहे. लोकसंसख्येच्या विस्फोटामुळे आणि त्यामुळे कमी होत जाणाऱ्या संसाधनांमुळे ही अपेक्षा पूर्ण होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. यासाठी प्रशासकीय व्यवस्था सक्रिय आणि परिणामकारक असणे अनिवार्य झाले आहे. आपल्या सामाजिक जीवनाच्या वाटचालीत मानवाने विकासाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. समाजाचे संचलन सुविहीतपणे होण्यासाठी अनेक व्यवस्थांची निर्मिती त्याने केली. झुंडीत आणि गटागटाने राहणारा प्राचीन मानव शारीरिक ताकदीलाच सर्वोच्च महत्त्व देत होता. ज्याची शारीरिक क्षमता जास्त त्यांचाच फक्त बोलबाला होता.आजही दुर्दैवाने देशाचे प्रशासन चालवणारे कायदे इंग्रजांच्या काळातीलच आहेत. त्यापैकी अनेक कायद्यांमध्ये आपल्या आवश्यकतेनुसार योग्य ते बदल केलेले नाहीत. यामुळे या कायद्यांमधून आपल्या प्रश्नांची समाधानकारक उकल होत नाही. या अनुषंगाने विचार केला असता असे लक्षात येते की, देशाच्या सध्याच्या न्याय प्रणालीत ही खूप साऱ्या सुधारणा करण्याची गरज आहे. आपल्याला अनेक वर्षे राजेशाहीचा अनुभव आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता बहुतेक राजांच्या काळात सर्वसामान्य प्रजेला कोणताही आवाज नव्हता. राजेशाहीमध्ये प्रशासनात सर्व-सामान्यांचा सहभाग नव्हता. प्रजेचे हित किंवा अहित कशात आहे; हे राजांवरच अवलंबून होते. प्रजेला समजून घेणे, त्यांच्या अडीअडचणींचे निराकरण करणे, यासारख्या बाबी राजा कितपत समजूतदार आहे आणि त्यास प्रजेविषयी किती आपुलकी आहे यावर अवलंबून होत्या. याला पर्याय म्हणून लोकशाही व्यवस्था उदयास आली. यामध्ये लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य हा विचार अंतर्भूत आहे. राजेशाही ते लोकशाही हा प्रवास खडतर होता. आजही जगातील अनेक देश लोकशाही व्यवस्थेपासून वंचित आहेत. या देशांमधील जनता अनेक प्रकारच्या हाल अपेष्टा सहन करीत आहे.

आपण भारतीय खूप भाग्यवान

आपल्या कृत्यामुळे जगाला त्रास झाला नाही, तर जगही आपल्याला त्रास देत नाही.